प्रेसनोट

दि.०९/१२/२०१९

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | तोफखाना पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.१६८७/२०१९ |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | राजेंद्र सुधाकर नेहुलकर, वरिष्ठ लिपीक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १२००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | --- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे मुलाचे वैद्यकीय खर्चाचे रुपये १३,११२/- चे बील मंजुरीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, अहमदनगर येथे दाखल केले होते. सदर वैद्यकीय प्रतिपुर्तीचे बीलाचे काम लवकर करुन देण्यासाठी तक्रारदार यांनी २०/११/२०१९ रोजी आरोपी लोकसेवक राजेंद्र सुधाकर नेहुलकर, वरिष्ठ लिपीक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे एकूण बीलाचे १० टक्के प्रमाणे १३००/- रुपये लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर कार्यालयात तक्रार नोंदविली. सदर लाच मागणी तक्रारीची दिनांक २०/११/२०१९ रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. त्या लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक राजेंद्र सुधाकर नेहुलकर, वरिष्ठ लिपीक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर यांनी तक्रारदार यांचे मुलाचे वैद्यकीय प्रतिपुर्ती बीलाचे काम लवकर करुन देण्यासाठी म्हणून तक्रारदार यांच्याकडे पंच साक्षीदारासमक्ष एकूण बीलाचे १० टक्के प्रमाणे १३००/- रुपये लाचेची मागणी करुन, तडजोडी अंती १२००/- रुपये लाचेची मागणी करुन ती स्वीकारण्याची तयारी दर्शविली म्हणून आरोपी लोकसेवक राजेंद्र सुधाकर नेहुलकर यांच्याविरुध्द तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ प्रमाणे आज दि.०९/१२/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:- ९९३०९९७७००

०९.१२

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,अहमदनगर

Scanned by CamScanner